सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

## सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८०.

(१ जानेवारी २०१५ पर्यंत सुधारित)

## Maharashtra Act No. VI of 1981

# Shree Siddhi Vinayak Ganpati Temple Trust (Prabhadevi) Act, 1980.

*(As modified upto the 1st January 2015)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रितआणि संचालक, शासकीय मुद्रण लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१५.

[ किंमत : रुपये ११.०० ]

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८०

अनुक्रमणिका


उद्देशिका

कलमे

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. मंदिर विश्वस्त व्यवस्थेची पुनर्रचना आणि त्या विश्वस्त व्यवस्थेकडे मालमत्ता हस्तांतरित व विहित होणे.

४. मालमत्तेचा ताबा मंदिर विश्वस्त व्यवस्थेकडे हस्तांतरित होणे.

५. मंदिर विश्वस्त व्यवस्थेचा कारभार चालविण्यासाठी समितीची रचना.

६. सदस्यांचे भत्ते.

७. सदस्यांचा पदावधी.

८. सदस्यत्वासाठी पात्रता.

९. नवीन सदस्य नियुक्त करण्याचे अधिकार.

१०. समितीच्या सभा आणि कार्यपद्धतीचे नियम.

११. जागा रिकामी राहिल्याने किंवा दोष राहिल्याने समितीचे कृत्य विधिअग्राह्य न ठरणे.

१२. समितीचे कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी.

१३. समितीच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये.

१४. कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.

१५. सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे कर्मचारी मंदिर विश्वस्त व्यवस्थेकडे नेमून देणे.

१६. समितीची कर्तव्ये व अधिकार.

१७. विश्वस्त निधी.

१८. विश्वस्त निधीचा वापर.

१९. व्यवस्थापन निधी व त्याचा वापर

२०. विश्वस्तव्यवस्था किंवा समिती यांच्यातर्फे किंवा त्यांच्याविरुद्ध दावे व इतर कार्यवाही.

२१. सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेतर्फे किंवा तिच्या विरुद्धची कायदेशीर कार्यवाही चालू ठेवणे आणि उक्त विश्वस्त व्यवस्थेसंबंधीच्या निर्देशांचा अन्वयार्थ लावणे.

२२. अधिनियम.

२३. समितीचे सदस्य आणि अधिकारी हे लोकसेवक असणे.

२४. सद्हेतूने केलेल्या कृत्यास संरक्षण.

२५. इतर कायदे, इत्यादींवर अधिनियम अधिभावी असणे.

२६. अडचणी दूर करणे.

२७. निरसन आणि व्यावृती.

[१] [सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६]

## श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८०

[राष्ट्रपती यांची दिनांक १५ जानेवारी १९८१ रोजी संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** भाग चार मध्ये दिनांक १७ जानेवारी १९८१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

या अधिनियमात पुढील अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८,

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ (३ नोव्हेंबर २००३) * †

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ (९ मे २००८) *

**"प्रभादेवी येथील श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था" म्हणून सर्वांना माहीत असलेल्या विश्वस्त व्यवस्थेची पुनर्रचना करणे आणि जनतेसाठी या विश्वस्त व्यवस्थेला अधिक व्यापक कल्याण कार्य करणे शक्य व्हावे म्हणून, एका समितीमार्फत त्याच्या व्यवस्थापनाची तरतूद करणे यासाठी अधिनियम.**

१९५० चा मुंबई २९. **ज्याअर्थी,** मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० याखाली, "श्रीगणपती मंदिर, प्रभादेवी मार्ग, दादर, मुंबई" या नावाने नोंदणी केलेल्या व श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था, प्रभादेवी म्हणून सर्वांना माहीत असलेल्या सार्वजनिक विश्वस्त व्यस्थेचा कारभार दावा क्रमांक २१७/१९३२ मधील मुंबई उच्च न्यायालयाचा संमती हुकूमनामा, दिनांक १६ जून १९३६ च्या आधारे, महाराष्ट्र राज्याच्या सरकारी विश्वस्ताकडे निहित होता ;

१९५० चा मुंबई २९. **आणि ज्याअर्थी,** धर्मादाय सह-आयुक्त यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० याच्या कलम ५० अ (१) अन्वये, १९७७ चा क्रमांक ३२ या स्वाधिकारे योजना तयार करण्याच्या कामकाजात, दिनांक ५ जुलै १९८० ला दिलेल्या आपल्या न्यायनिर्णयाद्वारे इतर गोष्टींबरोबरच, महाराष्ट्र एक्झिक्युटर अँड ट्रस्टी कंपनी लि. यांना अभिरक्षक विश्वस्त म्हणून नेमले होते, व या विश्वस्त व्यस्थेची मालमत्ता उक्त विश्वस्ताकडे निहित केली होती व व्यवस्थापन विश्वस्तांचे एक मंडळ नेमून, अभिरक्षक विश्वस्तांना असा निदेश दिला होता की, जर अभिरक्षक विश्वस्तांकडे मालमत्तेचा कब्जा देण्यास किंवा मालमत्तेचे त्यांच्याकडे हस्तांतरण करण्यास सरकारी विश्वस्तांना सांगण्यात आल्यानंतर वाजवी मुदतीत त्यांनी तसे केले नाही तर, सरकारी विश्वस्तास निदेश देण्यासाठी त्यांनी उच्च न्यायालयात योग्य ती कार्यवाही करावी ;

**आणि ज्याअर्थी,** धर्मादाय सह-आयुक्ताच्या या निर्णयाने व्यथित झाल्यामुळे, एका पक्षकाराने धर्मादाय सह-आयुक्तांच्या आदेशांच्या अंमलबजावणीविरूद्ध धर्मादाय आयुक्ताकडून एक स्थगन आदेश मिळवला होता ;

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग-पाच असाधारण, दिनांक २८ नोव्हेंबर १९८०, पृष्ठ २८५ (इंग्रजी) पहा.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

† सन २००४ चा अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम ३ द्वारे सन २००३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित करण्यात आला.

**आणि ज्याअर्थी,** प्रस्तुत विश्वस्त व्यवस्थेची मालमत्ता मोठी असून भक्तगणांसाठी हे मंदिर अत्यंत श्रद्धेचे स्थान आहे, परंतु सततच्या कोर्टकचेऱ्यांमुळे, विश्वस्त व्यस्थेच्या वाढत्या उत्पन्नाचा आतापर्यंत पुरेपूर विनियोग होऊ शकला नाही आणि कोर्टकचेऱ्यांवर आणखी वेळ व पैसा वाया जाऊ देण्याचे टाळणे आवश्यक होते ;

**आणि ज्याअर्थी,** या विश्वस्त व्यवस्थेची पुनर्रचना करणे, थेट सरकारी देखरेखीखाली, एका समितीमार्फत, तिच्या व्यवस्थापनाची तरतूद करून, आपल्या अतिरिक्त निधीमधून भक्तांना अधिक सुविधा देणे व सर्वसाधारण जनतेसाठी अधिक व्यापक कल्याणकार्य हाती घेणे या विश्वस्त व्यस्थेला शक्य व्हावे म्हणून, या महत्त्वाच्या व लोकप्रिय विश्वस्त व्यस्थेकरिता, एक स्वतंत्र कायदा असला पाहिजे याविषयी महाराष्ट्र शासनाची खात्री झालेली होती ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** पूर्वोक्त प्रयोजनांसाठी एक कायदा करण्याची कार्यवाही तात्काळ करणे महाराष्ट्राच्या राज्यपालांना ज्यामुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल राज्यपालांची खात्री झाली होती ; आणि त्या प्रयोजनासाठी त्यांनी श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था (प्रभादेवी) अध्यादेश, १९८० हा ११ ऑक्टोबर १९८० रोजी प्रख्यापित केला ; १९८० चा महा. अध्या. १०.

**आणि ज्याअर्थी,** आता उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकतिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० असे म्हणता येईल ;

(२) तो ११ ऑक्टोबर १९८० रोजी अंमलात आला असल्याचे समजण्यात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "नेमलेला दिवस" म्हणजे, ज्या दिवशी हा अधिनियम अंमलात आल्याचे समजण्यात आले असेल तो दिवस ;

(ब) "समिती" म्हणजे, या अधिनियमान्वये रचना केल्याप्रमाणे, मंदिर विश्वस्त व्यवस्थेच्या व्यवस्थापनासाठीची समिती ;

(क) "कार्यकारी अधिकारी" म्हणजे, समितीचा कार्यकारी अधिकारी ;

(ड) "व्यवस्थापन निधी" म्हणजे, या अधिनियमान्वये रचना केलेल्या समितीचा व्यवस्थापन निधी ;

(इ) "सदस्य" म्हणजे, समितीचा सदस्य, आणि त्यात, समितीचा सभापती व समितीचा कोषाध्यक्ष यांचा समावेश होतो ;

(फ) "सरकारी विश्वस्त" म्हणजे, सरकारी विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९१३ अन्वये महाराष्ट्र राज्यासाठी नेमलेला सरकारी विश्वस्त ; १९१३ च २.

(ग) "विहित" म्हणजे, राज्य शासनाने या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले ;

(ह) "विनियम" म्हणजे, या अधिनियमान्वये समितीने केलेले विनियम ;

(आय) "मंदिर" म्हणजे, प्रभादेवी, मुंबई येथील श्रीसिद्धिविनायक मंदिर म्हणून ओळखले जाणारे व मंदिर विश्वस्त व्यवस्थेच्या मालकीचे गणपती आणि इतर देवादिकांचे मंदिर ;

(जे) "मंदिर विश्वस्त व्यवस्था" किंवा "विश्वस्त व्यवस्था" म्हणजे, या अधिनियमाखाली रचना करण्यात आलेली मंदिरासाठीची विश्वस्तव्यवस्था ;

(के) "विश्वस्त व्यवस्था निधी" म्हणजे, या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या मंदिर विश्वस्त व्यवस्थेचा निधी.

१९५० चा मुंबई २९. **३.** नेमलेल्या दिवशी, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये, श्री गणपती मंदिर, प्रभादेवी मार्ग, दादर, मुंबई या नावे नोंदणी झालेल्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेऐवजी (यात यापुढे जिचा " सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था " असा निर्देश करण्यात आला आहे) " श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था (प्रभादेवी) " या नावाच्या एका विश्वस्त व्यवस्थेची या अधिनियमान्वये पुनर्रचना करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि त्या दिवसाच्या लगतपूर्वी, सरकारी विश्वस्तांकडून जी धारण करण्यात येत होती आणि त्यांच्याकडून जिचा कारभार पाहण्यात येत होता अशी स्थावर वा जंगम अशी सर्व मालमत्ता (सर्व मत्ता, हक्क, दायित्वे व बंधने यांसह) या अधिनियमाच्या आधारे, मंदिर विश्वस्त व्यवस्था किंवा विश्वस्त व्यवस्था या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पुनर्रचित विश्वस्त व्यवस्थेच्या प्रयोजनासाठी, मंदिरातील गणपती या देवतेकडे हस्तांतरित व निहित होईल. आणि सरकारी विश्वस्ताऐवजी समितीच्या वतीने कार्यकारी अधिकाऱ्यास त्या दिवसापासून त्या मालमत्तेचा ताबा घेण्याचा व तिचे व्यवस्थापन करण्याचा हक्क असेल. मंदिर विश्वस्त व्यवस्थेची पुनर्रचना आणि त्या विश्वस्त व्यवस्थेकडे मालमत्ता हस्तांतरित व निहित होणे.

४. (१) सरकारी विश्वस्त आणि कलम ३ अन्वये मंदिर विश्वस्त व्यवस्थेकडे निहित झालेली, सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेची कोणतीही स्थावर मालमत्ता ताब्यात असणारी इतर प्रत्येक व्यक्ती, ती सर्व मालमत्ता, त्यावरील जंगम मालमत्तेसह आणि तिच्या पूर्ण वस्तुसूचीसह, समितीच्या वतीने, ताबडतोब कार्यकारी अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील. मालमत्तेचा ताबा मंदिर विश्वस्त व्यवस्थेकडे हस्तांतरित होणे.

(२) सरकारी विश्वस्त आणि अशा रीतीने विहित झालेली सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेची कोणतीही जंगम मालमत्ता (बँकातील ठेवी किंवा शेअर्स किंवा प्रतिभूतीमधील गुंतवणुका किंवा दागिने, जडजवाहिर किंवा इतर मौल्यवान मालमत्ता धरून) ताब्यात असणारी इतर प्रत्येक व्यक्ती, नेमलेल्या दिवसापासून साठ दिवसांच्या आत किंवा समिती परवानगी देईल अशा आणखी कालावधीत, अशी मालमत्ता, संपूर्ण वस्तुसूचीसह समितीच्या वतीने कार्यकारी अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करील किंवा हस्तांतरित करण्याची व्यवस्था करील.

(३) या कलमान्वये कोणतीही मालमत्ता स्वाधीन किंवा हस्तांतरित करण्यात आली असेल त्याबाबतीत, कार्यकारी अधिकारी, वस्तुसूचीबरोबर यथोचित पडताळणी केल्यानंतर, हस्तांतरकांस योग्य ती पावती देईल आणि त्यानंतर, तिच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी कार्यकारी अधिकारी जबाबदार असेल.

(४) सरकारी विश्वस्त आणि सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेची कोणतीही मालमत्ता कार्यकारी अधिकाऱ्याच्या स्वाधीन किंवा हस्तांतरित करणारी आणि त्याबद्दल त्याची पावती घेणारी इतर प्रत्येक व्यक्ती हिचे याद्वारे, उक्त मालमत्तेसंबंधातील सर्व हिशेब, खटले किंवा इतर कायदेविषयक कामकाज, दावे व मागण्या किंवा दायित्व यांपासून क्षतिपूरण होईल व त्यापासून ती मुक्त होईल.

५. (१) मंदिर विश्वस्त व्यवस्थेचा कारभार चालविण्यासाठी म्हणून, नेमलेल्या दिवशी, " श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था व्यवस्थापन समिती " नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका समितीची रचना करण्यात आल्याचे मानण्यात येईल. मंदिर विश्वस्त व्यवस्थेचा कारभार चालविण्यासाठी समितीची रचना.

(२) या अधिनियमाच्या इतर उपबंधांस अधीन राहून, समिती, ही वरील नावने ओळखला जाणारा नियम निकाय असेल आणि तिची अखंड परंपरा असेल आणि तिचा एक सामाईक शिक्का असेल आणि तिला स्थावर व जंगम अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिची विल्हेवाट लावण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असेल, आणि तिला तिच्या उक्त नावाने दावा करता येईल किंवा तिच्यावर दावा लावता येईल.

(३) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एक सभापती, एक कोषाध्यक्ष आणि साताहून अधिक नसतील असे इतर सदस्य यांची मिळून होणारी एक समिती नियुक्त करील :

परंतु, राज्य शासनाला, वेळोवेळी तशाच प्रकारच्या अधिसूचनेद्वारे इतर सदस्यांची संख्या वाढविता येईल, मात्र सदस्यांची एकूण संख्या अकरापेक्षा अधिक असणार नाही.

सदस्यांचे भत्ते.

**६.** (१) अध्यक्ष, कोषाध्यक्ष किंवा, यथास्थिति, इतर सदस्य म्हणून आपल्या अधिकाराचा वापर करण्यासाठी आणि आपली कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी म्हणून, प्रत्येक सदस्यास, राज्य शासन वेळोवेळी ठरवील असे मानधन, फी व भत्ते, व्यवस्थापन निधीतून देण्यात येतील.

(२) त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी, एखादा सदस्य हा समितीचा सदस्य आहे किंवा त्यास या कलमान्वये कोणतेही मानधन, फी किंवा भत्ते मिळतात याच केवळ कारणावरून, तो राज्य विधानमंडळाचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास किंवा सदस्य असण्यास अपात्र ठरणार नाही.

सदस्यांचा पदावधी.

**७.** (१) सदस्याची नियुक्ती ही तीन वर्षांसाठी असेल आणि तो परत नियुक्त होण्यास पात्र असेल :

[१][परंतु, अशा मावळत्या सदस्यांचा पदावधी हा, नवीन समिती स्थापन करणारी अधिसूचना **राजपत्रात** प्रकाशित झाल्याच्या दिनांकापर्यंत, वाढवला गेल्याचे, व त्या दिनांकास समाप्त होत असल्याचे मानण्यात येईल.]

(२) सदस्यास, आपल्या सहीने, राज्य शासनास उद्देशून आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा देता येईल :

परंतु, राज्य शासनाने अशा राजीनाम्यास स्वीकृती दिल्याशिवाय तो अंमलात येणार नाही.

[२][(३) जर एखादा सदस्य, समितीकडून परवानगी घेतल्याशिवाय, समितीच्या, लागोपाठच्या तीन सभांना अनुपस्थित राहील तर तो, अशी तिसरी सभा रीतसर समाप्त झाल्याच्या वेळेपासून समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल.

**स्पष्टीकरण.**—एखादा सदस्य, पोट-कलम (३) अन्वये, सदस्य असण्याचे बंद झाले आहे किंवा कसे, असा कोणताही प्रश्न निर्माण झाला तर समिती, तो प्रश्न राज्य शासनाकडे किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे विचारार्थ पाठविल आणि राज्य शासनाने, किंवा, यथास्थिति, प्राधिकृत अधिकाऱ्याने, त्याला आवश्यक वाटले अशी चौकशी केल्यानंतर, दिलेला निर्णय अंतिम असेल.]

---

[१] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम २ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम २ द्वारे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

८. (१) एखादी व्यक्ती— सदस्यत्वासाठी अपात्रता.

(अ) अज्ञान असेल ;

(ब) नैतिक अद्य:पाताचा अंतर्भाव असेल अशा अपराधाबद्दल एखाद्या फौजदारी न्यायालयाकडून दोषी ठरली असेल ;

(क) विकल मनाची असेल आणि ती तशी असल्याबद्दल एखाद्या सक्षम न्यायालयाने घोषित केले असेल ;

(ड) आयुक्त नादार असेल ;

(ई) मंदिर विश्वस्त व्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेशी संबंधित अशा भाडेपट्ट्यात किंवा कोणत्याही इतर व्यवहारात, तिचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे हितसंबंध असेल ;

(फ) समितीची पगारी नोकर असेल किंवा मंदिर विश्वस्त व्यवस्थेच्या संबंधात समितीला माल पुरविण्यासंबंधीच्या किंवा तिने हाती घेतलेल्या कोणत्याही कामासंबंधीच्या किंवा कोणतीही सेवा देण्यासंबंधीच्या कोणत्याही करारात, अशा व्यक्तीचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल ;

(ग) कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल दोषी असेल किंवा अन्यथा अयोग्य असेल ;

तर, ती सदस्य म्हणून नियुक्त होण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.

(२) एखादा सदस्य वरीलपैकी कोणत्याही प्रकारे अपात्र झाला आहे, असे राज्य शासनास आढळून येईल तर, राज्य शासनास अशा सदस्यास कारण दाखविण्याची संधी दिल्यानंतर आणि दिलेले कारण विचारात घेतल्यानंतर अशा सदस्यास सदस्यपदावरून काढून टाकता येईल आणि राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

९. जेव्हा एखादा सदस्य— नवीन सदस्य नियुक्त करण्याचे अधिकार.

(अ) राजीनामा देईल किंवा मरण पावेल ;

(ब) समितीकडून परवानगी घेतल्याशिवाय सतत सहा महिन्यांच्या कालावधीसाठी भारताबाहेर राहील ;

(क) परदेशात वास्तव्य करण्याच्या प्रयोजनार्थ भारत सोडून जाईल ;

(ड) सदस्यत्वातून मुक्त होण्याची त्याची इच्छा असेल ;

(ई) कार्य करण्यास नकार देईल ;

(फ) राज्य शासन त्यास काढून टाकील किंवा त्याचे सदस्यत्व समाप्त करील ;

[१][(ग) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये त्याचे सदस्य असण्याचे बंद होईल, किंवा त्याला सदस्य होण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास अनर्ह ठरविण्यात येईल.]

राज्य शासनास, नवीन सदस्याची नियुक्ती करता येईल.

---

[१] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ३ द्वारे हा खंड जादा दाखल करण्यात आला.

समितीच्या सभा आणि कार्यपद्धतीचे नियम.

१०. (१) समिती, आपले कामकाज चालवण्यासाठी म्हणून स्वतः ठरवील अशा कालांतराने वेळोवेळी सभा भरवील ;

(२) समितीच्या सभेची तीन सदस्यांनी गणपूर्ती होईल ;

(३) समितीच्या प्रत्येक सभेच्या अध्यक्षपदी, सभापती व त्याच्या अनुपस्थितीत, उपस्थित असलेल्या सदस्यांनी त्या प्रयोजनासाठी निवडलेला सदस्य असेल ;

(४) समितीच्या सभेत उपस्थित होणाऱ्या सर्व प्रश्नांचा, उपस्थित असणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय करण्यात येईल. समसमान मते पडतील त्याबाबतीत, सभापतीस किंवा, यथास्थिति, अध्यक्षपदी असलेल्या व्यक्तीस, निर्णायक मत असेल व तो त्याचा वापर करील ;

(५) कार्यकारी अधिकारी हा समितीचा सचिव असल्याने, प्रत्येक सभेच्या कामकाजाची कार्यवृत्ते ठेवण्याची व त्यावर सभापतीची किंवा सभेच्या अध्यक्षपदी असलेल्या व्यक्तींची रीतसर स्वाक्षरी घेण्याची जबाबदारी त्याची असेल ;

(६) या कलमांच्या उपबंधास अधीन राहून, समितीस, आपल्या कार्यपद्धतीचे नियमन करण्यासाठी व कामकाज चालविण्यासाठी राज्य शासनाच्या संमतीने, विनियम करता येतील.

जागा रिकामी राहिल्याने किंवा दोष राहिल्याने समितीचे कृत्य विधिअग्राह्य न ठरणे.

**११.** समितीचे कोणतेही कृत्य किंवा कामकाज हे, समितीच्या सदस्यांची एखादी जागा रिकामी आहे किंवा तिच्या रचनेत अथवा कोणत्याही सदस्याच्या नेमणुकीत दोष आहे, याच केवळ कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही.

समितीचे कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी.

**१२.** (१) राज्य शासनास जी व्यक्ती शासनाचा राजपत्रित अधिकारी आहे किंवा होती अशा व्यक्तीची समितीचा कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक करता येईल आणि तो समितीचा पदसिद्ध सचिव असेल.

(२) समितीस, मंदिर विश्वस्त व्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालवण्यासाठी आणि या अधिनियमान्वये समितीची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) इतर अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल :

परंतु, ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा पाचशे रुपयांहून अधिक देण्यात येते किंवा द्यावयाचे असेल त्याची नेमणूक, राज्य शासनाची पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय, समितीला करता येणार नाही.

समितीच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये.

**१३.** (१) कार्यकारी अधिकारी हा, समितीचा मुख्य प्रशासन अधिकारी असेल, त्यास, समितीच्या नियंत्रणास, अधीन राहून, या अधिनियमाच्या उपबंधांनुसार समितीचे निर्णय अंमलात आणण्याचे सर्वसाधारण अधिकार असतील.

(२) विशेषेकरून, परंतु पूर्वगामी पोट-कलमांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, कार्यकारी अधिकारी, विश्वस्त व्यवस्थेची सर्व मालमत्ता व अभिलेख यांच्या अभिरक्षेसाठी जबाबदार असेल आणि तो मंदिरात देण्यात येणारी उपायने जमा करून ती ठेवण्याची योग्य ती व्यवस्था करील. समितीच्या नियंत्रणास अधीन राहून, कार्यकारी अधिकाऱ्यास,—

(अ) समितीच्या कोणत्याही अन्य अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे ;

(ब) बांधकामासाठी किंवा मालाच्या पुरवठ्यासाठी निविदा मागवण्याचे आणि जेव्हा अशा निविदेची रक्कम अथवा मूल्य दोन हजार रुपयांहून अधिक नसेल तेव्हा त्या निविदा स्वीकारण्याचे ;

(क) नाशवंत उपायनांची, लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि विक्रीचे उत्पन्न, मंदिराच्या निधीमध्ये जमा करण्याचे ;

(ड) भाविकांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे ;

(ई) जी कृत्ये व गोष्टी करण्यासाठी समितीने अधिकार प्रदान केलेले आहेत किंवा समितीने केलेल्या विनियमान्वये असे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत ती कृत्ये व गोष्टी, राज्य अधिकार मान्यतेने करण्याचे ;

अधिकार असतील.

(३) समितीने इतर अधिकारी व कर्मचारी हे, समितीने किंवा कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा समितीने राज्य शासनाच्या मान्यतेने केलेल्या विनियमान्वये त्यांना नेमून देण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करतील आणि अशी कर्तव्ये व कामे पार पाडतील.

कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.

१४. (१) समितीचा कार्यकारी अधिकारी हा, राज्य शासनाकडून वेळोवेळी ठरविण्यात येतील अशा सेवेच्या अटींवर व शर्तींवर नियुक्त करण्यात येईल.

(२) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी हे, राज्य शासनाची संमती घेऊन समितीने केलेल्या विनिमयांद्वारे ठरविण्यात येतील अशा सेवेच्या अटींवर व शर्तींवर नियुक्त करण्यात येतील.

(३) कार्यकारी अधिकाऱ्याचे आणि समितीच्या इतर अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च हे, व्यवस्थापन निधीतून देण्यात येतील.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे कर्मचारी मंदिर विश्वस्त व्यवस्थेकडे नेमून देणे.

१५. नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी, सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या कामकाजाशी संबंधित अशा सेवेत असेल अशी प्रत्येक व्यक्ती ही, उक्त दिवसाच्या निकटपूर्वी त्याला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व त्याच सेवेच्या अटी व शर्ती यांवर त्या दिवसापासून, समितीच्या नियंत्रणाखाली, मंदिर विश्वस्त व्यवस्थेच्या कामकाजाशी संबंधित अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त झाल्याचे मानण्यात येईल. आणि सेवेच्या अशा शर्तींमध्ये, राज्य शासनाच्या पूर्वसंमतीने असेल त्याशिवाय, त्या व्यक्तीचा गैरफायदा होईल अशा रीताने, समितीकडून कोणताही फेरबदल करण्यात येणार नाही :

परंतु, या अधिनियमाच्या उपबंधांनुसार किंवा समितीने राज्य शासनाच्या मान्यतेने, केलेल्या विनियमानुसार, अशा कोणत्याही व्यक्तींची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही.

समितीची कर्तव्ये अधिकार.

१६. (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, मंदिर विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था लावणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधि, पूजाअर्चा, समारंभ व उत्सव साजरे करण्यासाठी योग्य ती व्यवस्था.

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी पोट-कलमाच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, समिती—

(अ) विश्वस्त व्यवस्थेच्या जमाखर्चाचा अंदाज घेऊन वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे पाठवील ;

(ब) विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेचा व जमाखर्चाचा योग्य हिशेब व अभिलेख ठेवील ;

(क) विश्वस्त व्यवस्थेच्या हिशेबाची, राज्य शासन निदेश देईल अशा पुढील लगतवर्षातील तारखेपर्यंत व अशा व्यक्तीकडून वार्षिक लेखा परीक्षा करण्याची व्यवस्था करील ;

(ड) समितीच्या सदस्यांना, कार्यकारी अधिकाऱ्याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून नियमित वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय रकमा देईल ;

(ई) विश्वस्त व्यवस्थेच्या गहाळ झालेल्या मालमत्तेची व विश्वस्तव्यवस्थेला येणे असलेल्या रकमांची वसुली करण्यासाठी उपाययोजना करील ;

(फ) विश्वस्त व्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे, खटले व इतर न्यायालयीन कार्यवाही, न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणापुढे दाखल करील व त्यासंबंधात बचाव करील ;

(ग) विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तांची, वेळोवेळी तपासणी करील किंवा तपासणी करण्याची व्यवस्था करील, आणि अशा मालमत्तांवर कोणतेही अतिक्रमण झाले असल्यास, ते दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करील ;

(ह) राज्य शासन वेळोवेळी फर्मावील अशी विश्वस्त व्यवस्थेच्या संबंधातील विवरणे, आकडेवारी हिशेब व इतर माहिती पुरवील ;

(आय) विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्यासाठी सर्वसाधारणपणे आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

(३) विश्वस्त व्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने असेल त्याशिवाय, समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतींकरिता, भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही.

(४) विश्वस्त व्यवस्थेमध्ये निहित केलेले, पाच हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीचे कोणतेही जडजवाहीर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने असेल त्याशिवाय, समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही.

(५) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने असेल त्याशिवाय, समितीला कोणत्याही व्यक्तीकडून कर्जाऊ पैसे घेण्याचे अधिकार असणार नाहीत.

(६) या अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

विश्वस्त निधी. **१७.** (१) मंदिराच्या विश्वस्त व्यवस्थेचा स्वतःचा निधी असेल, त्याला " श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त निधी " असे संबोधण्यात येईल व तो गणपती या देवतेमध्ये निहित असेल.

(२) पुढील गोष्टींचा मिळून विश्वस्त निधी होईल किंवा विश्वस्त निधीमध्ये पुढील रकमांचा भरणा करण्यात येईल :—

(अ) कलम ३ च्या उपबंधांच्या आधारे देवतेमध्ये निहित असलेले असे सर्व निधी ;

(ब) देवतेपुढे ठेवलेली उपायने, भेटी किंवा देणग्या या रूपाने किंवा पूजा आकार म्हणून किंवा वस्तूरूपाने मिळालेल्या अशा वस्तूंच्या लिलावापासून मिळालेले विक्रिचे उत्पन्न ;

(क) विश्वस्त व्यवस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तेपासून मिळालेले उत्पन्न आणि अशा कोणत्याही मालमत्तेच्या विक्रीपासून, भाडेपट्ट्यापासून किंवा इतर हस्तांतरणापासून किंवा गहाणापासून मिळालेले उत्पन्न ;

(ड) शासनाने किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने, विश्वस्त व्यवस्थेने किंवा इतर संस्थेने विश्वस्त व्यवस्थेला, दिलेली कोणतीही अंशदाने किंवा अनुदाने ;

(ई) विश्वस्त व्यवस्थेला येणे असलेल्या आणि समितीने वसूल केलेल्या कोणत्याही रकमा ;

(फ) समितीने कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमा ;

(ग) विश्वस्त व्यवस्थेकरिता किंवा विश्वस्त व्यवस्थेच्या वतीने, समितीला किंवा कोणत्याही सदस्याला मिळालेल्या, किंवा समितीने किंवा सदस्याने वसूल केलेल्या, कोणत्याही रकमा.

(३) विश्वस्त निधीच्या मालकीचा सर्व पैसा व इतर मौल्यवान वस्तू, राज्य शासन वेळोवेळी जारी करील अशा मार्गदर्शक तत्त्वानुसार, अशा अभिरक्षेत किंवा अशा बँकेत ठेवण्यात येईल किंवा अशा रोख्यात गुंतवण्यात येईल.

(४) समितीने प्राधिकृत केलेला सदस्य किंवा अधिकारी, विश्वस्त निधीतील पैशांचा विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तीस अधीन राहून, व्यवहार करील.

**१८.** (१) समिती, विश्वस्त निधीचा वापर पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करील :— विश्वस्त निधीचा वापर.

(एक) मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन ;

(दोन) रूढीनुसार व प्रथेनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे ;

(तीन) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा कोणताही समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे ;

(चार) राज्य शासनाच्या मंजुरीने, समितीने कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमांची परतफेड करणे ;

(पाच) कोणत्याही न्यायालया किंवा लवाद न्यायाधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमा ;

(सहा) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्त व्यस्थेतर्फे देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई हप्ते, आकार व इतर रकमा यांचे प्रदान.

[१][(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, आणि विश्वस्त व्यवस्थेची, नजीकच्या भविष्यातील उद्दिष्टे, गरजा, आवश्यकता व सुधारणा यांसाठी तत्सम तरतूद केल्यानंतर, जर विश्वस्त व्यवस्था विधीमध्ये जादा शिल्लक राहिली तर, अशा जादा शिलकीच्या काही भागाचा समितीस, वेळोवेळी पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापर करता येईल :—

(एक) विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्ता विकसित करणे, आणि विश्वस्त व्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी जंगम किंवा स्थावर मालमत्तांचे संपादन करणे ;

(दोन) भक्तांकरिता राहण्याच्या जागेची सोय करण्यासाठी व त्यांच्या वापरासाठी विश्रामगृहे बांधणे व ती सुस्थितीत ठेवणे ;

---

[१] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ४ द्वारे मूळ पोट-कलम ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(तीन) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, कोणत्याही शैक्षणिक संस्था, रुग्णालये, दवाखाने, निराश्रित किंवा शारीरिकदृट्या अपंग व्यक्तींसाठी आश्रम (होम्स्) किंवा इतर धर्मादाय किंवा धार्मिक संस्था स्थापन करणे व त्यांची देखभाल करणे किंवा अशा संस्थाना किंवा व्यक्तींना वित्तसहाय्य करणे :

परंतु कोणत्याही विशिष्ट संस्थांना किंवा व्यक्तींना वित्तसहाय्य देण्यासाठी पूर्वमंजुरीकरिता राज्य शासनाकडे अर्ज करण्यापूर्वी, समिती प्रथम या पोट-कलमाच्या खंड (एक), (दोन) आणि (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या इतर प्रयोजनासाठी पुरेशा प्रमाणात खर्च होत आहेत यासंबंधी स्वत:ची खात्री करून घेईल आणि अर्जामध्ये अशा खर्चाचा तपशील आणि विविध संस्थांना व व्यक्तींना देण्याचे प्रस्तावित केलेली वेगवेगळी अनुदाने व या संस्थांची आणि व्यक्तींची निवड का करण्यात आली, ती कारणे देईल :]

[१][परंतु आणखी असे की, रुग्णास निकडीच्या स्वरूपाचा वैद्यकीय खर्च भागविण्यासाठी, वित्तीय सहाय्याची ताबडतोब आवश्यकता असल्याबाबत समितीची खात्री पटली तर ती, पंचवीस हजार रुपयांपर्यंतचे वित्तीय सहाय्य राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय मंजुर करील आणि अशी रक्कम थेटपणे संबंधित रुग्णालयाच्या नावाने धनादेश काढून देण्यात येईल. कार्यकारी अधिकारी, अशा प्रदानापासून तीन दिवसांच्या आत तपशीलवार अहवाल तयार करील आणि तो आवश्यक ते वैद्यकीय प्रमाणपत्र आणि समितीच्या निर्णयाची प्रत यांसह, माहितीसाठी राज्य शासनाकडे पाठवील.]

व्यवस्थापन निधी व त्याचा वापर.

**१९.** (१) व्यवस्थापन निधी नावाचा एक स्वतंत्र निधी स्थापन करण्यात येईल आणि तो, समितीकडे निहित असेल व समितीच्या नियंत्रणाखाली असेल.

(२) व्यवस्थापन निधीतील शिल्लक रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन, विश्वस्त-व्यवस्थेच्या लगत मागील वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी, या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, कोणत्याही वेळी, आवश्यक वाटेल तर, कोणत्याही वर्षात विश्वस्त व्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रकमा या निधीत जमा करण्याबद्दल निदेश देता येईल.

(३) व्यवस्थापन निधी, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, पुढील कारणासाठी लागू करण्यात येईल :—

(अ) समितीचा सभापती, कोषाध्यक्ष व इतर सदस्य यांचे मानधन, फी व भत्ते देणे ;

(ब) समितीचा कार्यकारी अधिकारी, इतर अधिकारी व कर्मचारी यांना वेतन, भत्ते व इतर देय रकमा देणे ;

(क) समितीने किंवा कोणत्याही सदस्याने किंवा अधिकाऱ्याने, या अधिनियमान्वयेच्या आपल्या अधिकारांचा वापर करताना आणि आपली कर्तव्ये व कामे पार पाडताना, कायदेशीररीत्या केलेल्या कोणत्याही खर्चाची रक्कम देणे.

---

[१] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ याच्या कलम २ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

२०. मंदिर विश्वस्त व्यवस्था किंवा समिती यांच्यातर्फेचे किंवा त्यांच्या विरूद्ध दाखल केलेले सर्व दावे व इतर न्यायालयीन कार्यवाही यांमध्ये, युक्तिवादाच्या कागदपत्रावर कार्यकारी अधिकारी सही करील व ती पडताळून पाहील आणि अशा दाव्यांमधील व कार्यवाहीतील सर्व आदेशिका, कार्यकारी अधिकाऱ्याच्या नावे काढण्यात किंवा त्याच्यावर बजावण्यात येतील.

विश्वस्त व्यवस्था किंवा समिती यांच्यातर्फे किंवा त्यांच्या विरूद्ध दावे व इतर कार्यवाही.

२१. (१) नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी, श्रीगणपती मंदिर, प्रभादेवी मार्ग, दादर, मुंबई या नावाची सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था ही किंवा तिचा कोणताही विश्वस्त हा, या अधिनियमाच्या उपबंधाच्या आधारे श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था (प्रभादेवी), या नावाने पुनर्रचना करण्यात आलेल्या विश्वस्त व्यवस्थेमध्ये निहित असलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या, हक्कांच्या, दायित्वाच्या किंवा बंधनाच्या संबंधातील कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत एक पक्षकार असेल त्या बाबतीत, पुनर्रचित विश्वस्त व्यवस्थेला किंवा तिच्या समितीला, या कार्यवाहीतील एक पक्षकार म्हणून, यथास्थिति उक्त सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था किंवा तिचा विश्वस्त याऐवजी दाखल करण्यात आल्याचे किंवा त्यातील एक पक्षकार म्हणून जादा दाखल करण्यात आल्याचे, मानण्यात येईल आणि उक्त कार्यवाही तदनुसार चालू ठेवण्यात येईल.

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेतर्फे किंवा तिच्या विरूद्धची कायदेशीर कार्यवाही चालू ठेवणे आणि उक्त विश्वस्त व्यवस्थेसंबंधीच्या निर्देशांचा अन्वयार्थ निर्देश लावणे.

(२) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील किंवा त्याखाली काढण्यात आलेल्या कोणत्याही नियमातील, विनियमातील, अधिसूचनेतील किंवा आदेशातील किंवा कोणत्याही विलेखातील किंवा इतर दस्ताऐवजातील सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था किंवा तिचा विश्वस्त याबाबतच्या कोणत्याही निर्देशाचा अर्थ, नेमलेल्या दिवशी किंवा त्यानंतर, संदर्भानुसार दुसरा अन्वयार्थ लावणे आवश्यक नसेल तर, यथास्थिति पुनर्रचित विश्वस्त व्यवस्था किंवा तिची समिती याबद्दलचा निर्देश असा लावण्यात येईल.

२२. (१) या अधिनियमाखालील नियम करण्याच्या अधिकाराचा, **शासकीय राजपत्रात** सूचना प्रसिद्ध करून, राज्य शासनाकडून वापर करण्यात येईल. नियम.

(२) या अधिनियमात अन्यत्र अंतर्भूत असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकाराला बाध न आणता, राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, नियम करता येतील.

(३) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम हे पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहतील :

परंतु, जीमुळे तात्काळ कृती करणे आवश्यक आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री होईल तर, त्यास या अधिनियमाखाली कोणताही नियम आधी प्रसिद्ध न करता, करता येईल.

(४) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखापासून यथास्थिति

अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येतील किंवा येणार नाहीत ; तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

समितीचे सदस्य आणि अधिकारी हे लोकसेवक असणे.

**२३.** समितीचे सदस्य आणि तिचे सर्व अधिकारी व सेवक हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

सद्हेतूने केलेल्या कृत्यास संरक्षण.

**२४.** राज्य शासनाने, सरकारी विश्वस्ताने, समितीने किंवा समितीच्या कोणत्याही सदस्याने, अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने, या अधिनियमानुसार किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमानुसार आणि विनियमानुसार सद्हेतूने केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल त्याच्याविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही दाखल करता येणार नाही.

इतर कायदे इत्यादींवर अधिनियम अधिभावी असणे.

**२५.** मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५०, सरकारी विश्वस्त अधिनियम, १९१३ किंवा त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यामध्ये किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या व्यवस्थापनाच्या कोणत्याही योजनेमध्ये किंवा कोणत्याही न्यायलयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा धर्मादाय आयुक्ताच्या किंवा इतर सक्षम प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात किंवा कोणत्याही रूढीत किंवा परिपाठात काहीही अंतर्भूत असेल तरी, या अधिनियमाचे उपबंध अंमलात राहतील.

अडचणी दूर करणे.

**२६.** या अधिनिमाच्या कोणत्याही उपबंधाची अंमलबजावणी करताना कोणताही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, आदेशाद्वारे, अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु नेमलेल्या दिवसापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

निरसन आणि व्यावृत्ती.

**२७.** (१) श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था (प्रभादेवी) अध्यादेश, १९८० हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरी, उक्त अध्यादेशाद्वारे केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई (केलेला कोणताही नियम, विनियम किंवा काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश किंवा केलेली कोणतीही नेमणूक यांसह) ही या अधिनियमाच्या संबंधित उपबंधांन्वये केलेली गोष्ट किंवा कारवाई किंवा काढलेली अधिसूचना किंवा केलेली नेमणूक इत्यादी असल्याचे मानण्यात येईल.

---

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग,
  **मुंबई ४०० ००४.**
  दूरध्वनी : ०२२–२३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  **पुणे ४११ ००१.**
  दूरध्वनी : ०२०–२६१२ ५८०८, २६१२ ४७ ५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाइन्स,
  **नागपूर ४४० ००१.**
  दूरध्वनी : ०७१२–२५६२ ६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  **औरंगाबाद ४३१ ००१.**
  दूरध्वनी : ०२४०–२३३१ ४६८, २३३१ ५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क,
  **कोल्हापूर ४१६ ००३.**
  दूरध्वनी : ०२३१–२६५० ३९५, २६५० ४०२

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**